अधिव्याख्याता, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदावरील नियुक्ती रद्द करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. ससेनि-३२१५/प्र.क्र.२७०/१५/तांशि-७,**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १४ नोव्हेंबर, २०१७

पहा : १) या विभागाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दि. २५ जुलै, २०१६.
२) या विभागाचा पत्र क्र. मुदत-३७१६/प्र.क्र.१६६/१६/तांशि-७, दि.२३ ऑगस्ट, २०१६, दि.०७ ऑक्टोबर, २०१६ व दि.२७ डिसेंबर, २०१६.
३) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती यांचे पत्र दि.०२ जानेवारी,२०१७.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत श्री. पंकज श्रीरामजी ब्राम्हणे यांना अधिव्याख्याता, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या पदावर संदर्भाधिन क्र. ०१ येथील शासन निर्णयाव्दारे दोन वर्षांच्या परिविक्षा कालावधीसाठी खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार स्थानापन्न नियुक्ती देण्यात आली होती. तसेच, संबधित पदावर रूजू होण्याकरीता संदर्भाधीन क्र.२ येथील शासन पत्रान्वये वारांवार मुदतवाढ दिल्यानंतरही श्री. ब्राम्हणे, अधिव्याख्याता, विद्युत अभियांत्रिकी या पदावर रूजू झाले नसल्याचे प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती यांनी संदर्भाधीन क्र.३ येथील पत्रान्वये कळविले आहे. सबब,श्री. ब्राम्हणे यांना संबधित पदावर रूजू होण्यास स्वारस्य नसल्याचे लक्षात येत असल्याने संदर्भाधिन क्र. ०१ येथील शासन निर्णयाव्दारे करण्यात आलेली त्यांची स्थानापन्न नियुक्ती या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

| गुणवत्ता क्र. | आयोग पुरस्कृत उमेदवारांचे नांव | वर्गवारी | आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ३१ | श्री. ब्राम्हणे पंकज श्रीरामजी | अ. जा. | अ. जा. | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती. |

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०१७१११४१५४२२८२१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Sudhir Jaya Shetty

Digitally signed by Sudhir Jaya Shetty
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, serialNumber=e9d37d499a521b728aeb3dc8ec38b759420308b9fd7816002b4af0ffbf1111d7, cn=Sudhir Jaya Shetty
Date: 2017.11.14 15:45:13 +05'30'

**(सुधीर जया शेट्टी)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति:** संबंधित उमेदवार (पोच देय नोंदणीकृत डाकेने)

**प्रत :**

१) मा. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.
३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राव्दारे)
४) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
८) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती.
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
११) निवड नस्ती (तांशि-७).